00251

क्र.का.४/प्र.क्र. ४१७९/२००५/८०३
**नोंदणी महानिरीक्षक व/ मुद्रांक नियंत्रक**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे**
दिनांक - ३०/०४/२००५.

**विषय :-** नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ७१ अन्वये करावयाच्या कार्यवाहीबाबत.

**संदर्भ :- १.** मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट पिटीशन कमांक : ६६२२/२००२.
(श्री.सी.पी.सेतुमाधवन व इतर)
**२.** रिट पिटीशन क्रमांक : ६७९०/२००२.
(श्री. सी.पी.उन्नीकृष्णन व इतर)

**परिपत्रक :-**

नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम १७ व १८ नुसार विविध प्रकारचे दस्तऐवज नोंदणीकरिता सह दुय्यम निबंधक कार्यालयात सादर करण्यांत येतात. दस्तऐवज नोंदणीसाठी सादर केले असता, संबंधित सह दुय्यम निबंधक यांना जर ते दस्तऐवज, राज्यात अंमलात असलेल्या विविध अधिनियमांतर्गत व नोंदणी अधिनियमाचे कलम २२ अ च्या तरतुदीन्वये प्रसिध्द् केलेल्या दि. १८/०९/२००२ च्या अधिसूचनेनुसार व तदनुषंगाने प्रसिध्द् करण्यांत आलेल्या दि. ०६/०१/२००३ च्या परिपत्रकानुसार, नोंदणीसाठी नाकारावयाचे असेल तर उक्त अधिनियमाच्या कलम ७१ च्या तरतुदीन्वये नाकारावयाची कारणे नमूद करुन असे दस्तऐवज नोंदणी नाकारु शकतात.

२/- या कार्यालयास प्राप्त तक्रारीवरुन असे निदर्शनास आलेले आहे की, दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीस आलेल्या दस्तांबाबत दुय्यम निबंधक हे दस्त तपासल्यानंतर दस्तातील आक्षेपित मुद्यांबाबत पक्षकारांशी चर्चा करुन दस्त नोंदणीस स्विकारत नाहीत. व दस्त परत करतात. पक्षकारांनी आक्षेपाबाबत लेखी मागणी केल्यास लेखी उत्तर देत नाहीत. त्यामुळे नोंदणीस येणाऱ्या जनतेत या विभागाबद्दल अनेक वेळा नाराजी व्यक्त केली आहे. नोंदणी कायदा कलम ७१ अन्वये दुय्यम निबंधक यांना नोंदणी कायद्याच्या तरतुदीनुसार दस्ताची पूर्तता झालेली नसेल व कायदेशीर बाबी पूर्ण केलेल्या नसतील तर तो दस्त नोंदणीस नाकारुन कलम ७१ खालील कार्यवाही करावी व तसेच संबंधित पक्षकारास कळवावे.

३/- यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने नजिकच्या काळात संदर्भित रिट पिटीशन द्वारे सह दुय्यम निबंधक यांना उक्त कलम ७१ अन्वये दस्तऐवज नोंदणीस नाकारावयाचे झाल्यास तसे कारणासह आदेश पारित करण्याबाबत निर्देशित केलेले आहे. त्यानुसार त्याबाबतच्या नोंदी पुस्तक क्र. २ मध्ये घेवून संबंधित पक्षकाराला त्याच्या प्रती त्वरित देण्यात याव्यात. उक्त अधिनियमाचे कलम ७१ अन्वये जर सह दुय्यम निबंधक यांनी दस्तऐवज नोंदणीस नाकारल्याबाबत आदेश पारित केला नसेल तर त्यातील कलम ७२ अन्वये पक्षकाराला जिल्हा निबंधकांकडे त्याबाबतचे अपील दाखल करण्यांस वाव मिळत नसल्याचे मा. न्यायालयाने निदर्शनास आणून दिले आहे.

..२/-

सर्व संबधितांना याद्वारे आदेशित करण्यात येते की, आपले अधिनस्त सर्व दुय्यम निबंधक कार याबाबत योग्य ते निर्देश देवून नोंदणी अधिनियमाचे कलम ७१ मधील तरतुदीचे काटेकोरपणे पालन होईल दखल घेण्यांत यावी.

**का.प्र.मा.नों.म.नि.,**
**यांचे सहीची असे.**

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे करिता.**

प्रत :-

१. सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक.
२. मुद्रांक अधिक्षक, मुंबई.
३. सर्व सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी.
४. सर्व दुय्यम निबंधक यांना (सजिनि यांचे मार्फत).
५. सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.